# शंकर जयकिशन - भाग ५



आता आपण नाचतानाच्या पदन्यासाबरोबर दिलेले संगीत पाहूया. 'कठपुतली' मध्ये 'इतने बडे जहाँ मे ऐ दिल, तुझको-१-२-३-तुझको अकेला छोडू कैसे' या गाण्यात १-२-३ च्या जागी पायांचा ठेका आणि ढोलकची थाप एकाच वेळी घेण्याचे कसब वाखाणण्याजोगे आहे. तसेच याच चित्रपटातील 'बोल री कठपुतली डोरी कौन संग बाँधी' हे गाणे, आणि कठपुतळ्याची ओळख करून देताना 'चोरी चोरी' चित्रपटात, 'जहाँ मै जाती हूँ, वही चले आते हो' ह्या गाण्यातही तेच कसब जाणवते.

आपल्यापैकी कित्येक लोकांना खरंच वाटत नाही की आपल्या हयातीत शंकर जयकिशन सारखे दिग्गज कसे काय आले आणि अविस्मरणीय कर्णमधुर संगीताची अविरत मेजवानी आपल्या सुदैवाने आपल्याला कशी काय मिळाली ? अहो भाग्यम् ! असे म्हणण्यासारखीच ही घटना आहे. त्यांना अमरत्व देता येणार नाही कारण आपल्या पुढील पिढीला त्यांच्याबद्दल कितपत माहिती असेल ही शंकाच आहे आणि ते समजण्यासारखे आहे. परंतु आपल्यासारख्या ज्या रसिकांनी, अनेक वर्षे या दोघा संगीतकारांनी दिलेल्या सुमधुर गाण्यांचा निर्भेळ आनंद लुटला आहे तो अवर्णनीय आहे. त्यापुढे शब्द अपुरे पडतील.

खरे सांगायचे तर चालचलणूक, सवयी, रीतीभाती, स्वभाव आणि संगीत हाताळण्याची पध्दती या सर्व बाबतीत ते एकमेकांच्या अगदी विरुध्द विचारांचे होते. शंकर हे फारच धार्मिक वृत्तीचे होते, तर जयकिशन क्वचितच देवधर्म करणारे ! शंकर हे शांत व अंतर्मुख स्वभावाचे होते, तर जयकिशन यांचा स्वभाव मोकळा ढाकळा होता व त्यांना माणसांत मिसळणे आवडायचे. शंकर दिसायला सामान्य आणि धीम्या प्रवृत्तीचे, तर जयकिशन दिसायला छानच, सदैव कार्यरत आणि तरतरीत ! शंकर तब्येतीची काळजी घेणारे, तर जयकिशन मौजमौजी ! शंकर शिस्तीने काम करणारे, तर जयकिशन

अव्यवस्थित ! शंकर रात्री १० वाजता घर गाठायचे, तर जयकिशन यांची रात्र तेव्हाच सुरू व्हायची! शंकर कामानंतर घरी गेल्यावर जयकिशन बहुधा सततच दक्षिण मुंबईतील चर्चगेटच्या 'गेलॉर्ड' ह्या बार अँड रेस्टॉरंटमध्ये मित्रमंडळीत दिसायचे. जवळ जवळ नेहमीच ते ह्या रेस्टॉरंटमध्ये मित्रांच्या गराड्यात असायचे. जणू दरबारच भरायचा म्हटलं तरी चालेल. अर्थात हे रेस्टॉरंट जयकिशन यांचा सुवर्णकाळाच्या आधीच सुरू झाले होते, परंतु ते त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी इतके मिळते जुळते होते की जयकिशन जर त्याचे मालक असते, तर त्यांनीही ह्या रेस्टॉरंटला तेच नाव दिले असते, एव्हढे ते साजेसे होते. शंकर सुध्दा चर्चगेटलाच इथून जवळच, जुनी मूल्ये सांभाळणाऱ्या नेमस्त अशा क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या लॉन्सवर सापडायचे. बऱ्याच वेळा, मोकळा वेळ असेल तर दुपारनंतर तिथेच चहा घ्यायचे. तेव्हा त्यांच्याबरोबर एखाद दुसरी व्यक्ती असायची किंवा ते एकटेच असायचे. शंकर चुकून सुध्दा दारू पीत नसत. परंतु जयकिशन यांना मात्र दारूचा आस्वाद हवासा वाटे. या दोघांच्या चर्चगेटजवळ येण्याच्या या कारणांमुळे, तिथल्या 'इरॉस'जवळच्या रहदारीच्या गर्दीच्या चौकाला 'शंकर-जयकिशन चौक' असे दिलेले नाव भौगोलिक दृष्ट्या चपखल वाटते.

कामाच्या ठिकाणी सुध्दा शंकर लवकरच येत आणि ते धीरसोगंभीर वृत्तीचे होते. परंतु त्यांचे जोडीदार राजेशाही थाटाचे ! त्यामुळे ते त्यांच्या सोईनुसार येत आणि आपला अरेंजर सबास्टीअन याला गाण्याच्या चालीचे सूर अकॉर्डियनवर ऐकवीत आणि तो आपल्या गुरूला ती उलट व्हायोलिनवरून ऐकवीत असे. एव्हढेच पुरे असे ! मग अरेंजर कोणती वाद्ये वापरायची ते ठरवून संगीत वादकांना गाण्याची चाल समजावून द्यायचा. शैलेंद्र हे शंकर यांचे आवडते गीतकार होते, तर जयकिशन हे हसरत जयपुरी यांच्यावर खूष होते. जयकिशन यांना चित्रपट पाहण्याचा षौक होता. वेळेला ते दिवशी २-२ चित्रपट पण पहायचे ! त्यांचे मित्र आणि चित्रपट निर्माता असलेल्या सतीश वागळे यांच्या मते त्यांना काव्याची आवड होती. त्यांचे कविता वाचन अफाट होते आणि त्यामुळे चित्रपटगीताची पहिली ओळ बहुधा तेच लिहीत. शंकर यांना अशी आवड नव्हती.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories”

is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com